पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर
नविन प्रशासकिय इमारत संकुल, प्लॉट नं. १, सेक्टर – १५
मोरेकुरण रोड, कोळगाव, नवनगर, ता. जि. पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp.palghar@mahapolice.gmail.com

प्रेसनोट क्र.९५ दिनांक २०/०९/२०२५

पालघर पोलीस दलाकडून अनैतिक मानवी व्यापार करणाऱ्या आरोपींवर कारवाई करुन तीन पिडीत महिलांची सुटका

स्थानिक गुन्हे शाखा, पालघर व अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष, पालघर यांची कारवाई.

पोलीस अधीक्षक पालघर श्री. यतिश देशमुख यांनी पालघर जिल्हयातील अवैद्य धंदयाचे समूळ उच्चाटन करणे बाबत सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी व स्थानिक गुन्हे शाखा, पालघर यांना सक्त सुचना दिलेल्या आहेत.

दि.१९/०९/२०२५ रोजी पोलीस निरीक्षक श्री. प्रदिप पाटील, स्थानिक गुन्हे शाखा, पालघर यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे, शाखा, पालघर यांचे पथकाने बोईसर येथे सहारा हॉटेल एन्क्लेव्ह बिल्डींग, नवापुर नाका बोईसर ता. जि. पालघर येथे वेश्याव्यवसाय चालत असल्याची गुप्त माहिती मिळवली. नमूद माहितीच्या आधारे सापळा रचुन दि.१९/०९/२०२५ रोजी १७.५५ वा.चे सुमारास सहारा हॉटेल एन्क्लेव्ह बिल्डींग, नवापुर नाका बोईसर ता. जि. पालघर येथे डमी गिऱ्हाईक यांना आरोपीत विनय जयकिसन धुपर, वय ३९ वर्षे, व्यवसाय-हॉटेल मॅनेजर रा. परनाळी ता.जि. पालघर मुळ रा. पटीयाला पंजाब राज्य यांनी ०३ पिडीत महीलांना वेश्या व्यावसायाकरीता मिळवुन त्यांना वेश्या व्यावसाय करीता प्रवृत्त करून त्या पिडीत महिला पुरुष गि-हाईकास वेश्यागनमना करीता पुरवुन नमुद महिलांच्या वेश्यागमनाचा मोबदला स्वतःच्या उपजिवीकेसाठी स्विकारुन पिडीत महिलांना पुरुष ग्राहकासांठी वेश्यागमनाकरीता उद्युक्त करून वेश्या व्यवसायाच्या प्राप्त कमाईच्या मिळकतीवर अवलंबुन राहुन वेश्याव्यवसायास प्रेरणा दिली म्हणून आरोपीविरूध्द बोईसर पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ४१५/२०२५ भारतीय न्याय संहिता अधिनियमय २०२३ चे कलम १४४ (२) सह अनैतिक व्यापार प्रतिबंधक अधिनियम १९५६ चे कलम ३, ४, व ५ प्रमाणे दि. २०/०९/२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नमूद गुन्ह्यात आरोपीस अटक करण्यात आली आहे. तसेच तिनही पिडीत महिलांना चिल्ड्रन होम फॉर गर्ल्स रेस्क्यु फाऊंडेशन बोईसर येथे दाखल करण्याची व आरोपीस मा. न्यायालयात हजर करण्याची कारवाई करण्यात येत आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि/अनिल व्हटकर, नेमणूक स्थानिक गुन्हे शाखा, पालघर हे करीत आहेत.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक, पालघर श्री. यतिश देशमुख, अपर पोलीस अधीक्षक, पालघर श्री. विनायक नरळे यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे पोलीस निरीक्षक श्री. प्रदिप पाटील, सहा.पो.निरीक्षक श्री. अनिल व्हटकर, पोउपनि/गोरखनाथ राठोड, पोउपनि/कृष्णा ठाकरे, पोहवा/दिपक राऊत्, पोहवा/संदिप सुर्यवंशी, पोहवा/कपिल नेमाडे, पोहवा/भगवान आव्हाड, पोहवा/प्रकाश महाले, पोना/राजेंद्र हरणे, पोना/मनोज राऊत, पोअमं/स्वप्नील जाधव, म.पोहवा/संजीवनी धांगडा, म.पोना/सीमा भोये सर्व नेमणूक स्थानिक गुन्हे, शाखा, पालघर व अनैतीक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष, पालघर यांनी पार पाडलेली आहे.